॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जा.क्र.: कबचौउमवि/ सीटीपीसी /हस्तदेय/२०२३ दि.२६/०६/२०२३

प्रति,

१. मा. प्राचार्य,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी सलग्नित, जळगाव, धुळे व नंदुरबार.

२. प्रशाळेचे संचालक व विभाग प्रमुख, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

महोदय/ महोदया,

इन्फोसिस सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या सोशल रिस्पॉसिबिलिटी अंतर्गत "प्रोजेक्ट जेनेसिस फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम" नावाने एक उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमाद्वारे महाविद्यालयीन प्राध्यापकांना "ट्रेन द ट्रेनर" या मॉडेल अंतर्गत प्रशिक्षण दिले जाते.

हे प्रशिक्षण पुणे येथील इन्फोसिस कंपनीच्या कॅम्पस मध्ये दिनांक ०३ ऑगस्ट २०२३ ते ११ ऑगस्ट २०२३ या दरम्यान आयोजित करण्यात आलेले आहे. हे प्रशिक्षण प्रामुख्याने विद्यार्थ्यांमध्ये "Employability skills" वाढवण्यासाठी उपयुक्त ठरेल. यात तांत्रिक बाबींवर जास्त भर नसेल. या नऊ दिवसीय निवासी प्रशिक्षणामध्ये **Facilitation Skills, Language Enhancement and Quantitative Aptitude and Analytical Skills** इ. मुददयांवर रोज आठ तास प्रशिक्षण देण्यात येईल. प्रत्येक प्रशिक्षणार्थी प्राध्यपाकाने प्रशिक्षणानंतर त्यांच्या महाविद्यालयामध्ये किंवा शक्य असेल त्या ठिकाणी किमान शंभर विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे व त्याबाबतचा फोटोसह अहवाल आणि विद्यार्थ्यांची उपस्थितीपत्रक सेंट्रल ट्रेनिग ॲण्ड प्लेसमेंट सेल कबचौउमवि, जळगाव येथे देणे अपेक्षित आहे.

या प्रशिक्षणासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमधील व प्रशाळा मधील कार्यरत प्राध्यापक / समन्वयक ला आमंत्रित करण्यात येत आहे. सुमारे ३०-४० प्राध्यापकांची एक तुकडी या प्रशिक्षणासाठी विद्यापीठामार्फत पाठवायची आहे. यासाठी प्राचार्य / संचालक यांनी **नियमित शिक्षकांचेच नामांकन करावे.** ज्या शिक्षकांनी सदर इन्फोसिस च्या FDP ला या आधी सहभाग घेतला असेल अशा शिक्षकांना वगळून नामांकन करावे. प्राचार्य/ संचालक यांनी नामांकन केलेल्याचे पत्र शिक्षकाचे नाव, मोबाईल नंबर व इ-मेलसह स्वक्षरीने tpc@nmu.ac.in या मेलवर पाठवावे. या प्रशिक्षणादरम्यान पुणे येथे निवास व भोजनाची सर्व व्यवस्था इन्फोसिस तर्फे निशुल्क करण्यात येईल. या सोबतच आवश्यक ते सर्व शैक्षणिक साहित्य, पुस्तके नि:शुल्क पुरविले जाईल.

**नोदणी करण्याची शेवटची दिनांक ४ जूलै २०२३.**

या संधीचा उपयोग महाविद्यालयांनी करुन घ्यावा असे आवाहन मा. कुलगुरु प्रा. विजय एल. माहेश्वरी यांनी केले आहे.

धन्यवाद.

सेट्रल ट्रेनिग ॲण्ड प्लेसमेंट सेल, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठा, जळगाव.
संपर्क: प्लेसमेंट ऑफिसर, सोनाली दायमा, tpc@nmu.ac.in७६२०३४४३७७ ऑफिस नं.०२५७- २२५७३४६

Rsardar

**प्रा. रमेश जे. सरदार**
**समन्वयक**